तरुण भारत

रत्नागिरी

www.tarunbharat.com

रु. ३.००

शुक्रवार दि. ४ मे २००७

वास्तूशास्त्र तज्ज्ञ डॉ. रविराज अहिरराव यांचा दावा

▶ चिपळूण / -

गेली अनेक वर्षे अडचणीत सापडलेल्या गुहागर येथील रत्नागिरी गॅस आणि विद्युत प्रकल्पाच्या वास्तूतच दोष असून आपल्याला संधी दिल्यास वास्तूशास्त्राच्या आधारे तो दोष दूर करू, असा दावा वास्तूशास्त्र तज्ज्ञ डॉ. रविराज अहिरराव यांनी गुरूवारी येथे आयोजित पत्रकार परिषदेत केला.

कोकण दौऱ्यावर आलेले डॉ. अहिरराव पुढे म्हणाले की, गेली कित्येक वर्षे बंद पडलेला दाभोळ वीज प्रकल्प पुन्हा रत्नागिरी गॅस आणि विद्युत प्रकल्प या नावे सुरू करण्यात आला. मात्र आजही या प्रकल्पाला अनेक अडचणीना सामोरे जावे लागत असल्याने हा प्रकल्प धारगळला आहे. हा प्रकल्प आपण पाहिला नसला तरी त्यांच्या वास्तूत एकेरी एक टक्का दोष आहे. म्हणूनच हा प्रकल्प अडचणीतून जात आहे. यदाकदाचित हा दोष दूर करण्याची संधी मिळाली तर नक्कीच आपण वास्तूशास्त्राच्या माध्यमातून विनातोडफोड उपाययोजना करून तो मार्गी लावू शकतो. जपानसारख्या देशानेही अंबरनाथ येथे ओझी केमिकल्स ही कंपनी उभारताना वास्तूशास्त्राचा आधार घेतला आहे. ते काम आपणच केले असून अशा अनेक परदेशी कंपन्यांसाठी काम करत असल्याचेही त्यांनी सांगितले.

वास्तूशास्त्र हे अध्यात्म व गूढ विद्येशी संबंधित शास्त्र असून त्याला प्राचीन भारतीय शास्त्राचा आधार आहे. अशा पारंपारिक भारतीय वास्तूशास्त्राचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत आहे. या शास्त्राला 'सर्व्हीस इंडस्ट्रीज'चा दर्जा देण्यासाठी आपण व आपली पत्नी सौ. मंजुश्री अहिरराव प्रयत्न करत आहोत. चीनच्या शास्त्राने फेंगशुईच्या माध्यमातून जसा जगभर ठसा उमटवला आहे त्याच पद्धतीने भारतीय प्राचीन शास्त्राला स्थान प्राप्त करून देण्यासाठी मार्केटींग

डॉ. रविराज अहिरराव

करणे आवश्यक आहे. यासाठी डॉ. रवीराज वास्तू स्पिरिच्युअर सर्व्हीसेस प्रा. लि.च्या माध्यमातून ठिकठिकाणी शाखा सुरू करून कमी खर्चात वास्तूशास्त्राचे मार्गदर्शन मिळेल अशी योजना हाती घेण्यात येणार आहे. मात्र हे करताना वास्तूशास्त्राचे पावित्र्य कायम राखून त्याच्या माध्यमातून सर्वांचे जीवन सुखी व्हावे हाच मुख्य उद्देश असल्याचे ते म्हणाले.

सुमारे तेरा वर्षापासून आपण वास्तूक्षेत्रात कार्यरत असून आजपर्यंत १४ हजारापेक्षा अधिक वास्तूना प्रत्यक्ष मार्गदर्शन करून उपाययोजना सूचवत त्यात वास्तव्य

कृपया पान ११ पहा ▶

'रत्नागिरी गॅस'च्या वास्तूतच दोष

▶ पान १ वरून

अथवा व्यवसाय करणाऱ्या लोकांना खूप चांगले आरोग्य मिळवून देण्यात यश प्राप्त केले आहे. या संस्थेचे कार्यालय ठाणे व पुणे येथे असून त्यात वीस वास्तूतज्ज्ञांचा ताफा काम करीत आहे. या संस्थेमार्फत भारतात तसेच विदेशात सर्वत्र वास्तूशास्त्र मार्गदर्शन सेवा पुरवण्यात येत आहे.

कोल्हापूर : भारतीय विकास संशोधन केंद्र गांधीनगर